# अनुक्रमणिका

विषय


| | |
|---|---|
| संपादकीय ... ... ... | |
| श्री साईमहाराजांच्या चरित्राचें रहस्य ... ... | ६ |
| बाबा व ज्ञानेश्वरी ... ... ... | ९ |
| श्री सद्गुरु साईनाथ सेवा संस्था—अहवाल ... | ११ |
| शिर्डीवृत्त ... ... ... | १४ |
| अनुभव ... ... ... | |
| Opinions of Visitors ... ... ... | |
| Experiences ... ... ... | |


## श्रीसाईभक्तांस विनंती

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पाठविलेले पाठ उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात तरी कृपा करून आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनी आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून ? पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं गेल्या व चालू सालची म्हणजे शके १८६०—६१ ची वर्गणी ६ आ. अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनि पाठवून द्यावी, अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें.


रा. वा. घैसास, संपादक.
लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २,
गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई १४


Subscribers are requested to send in the subscription Rs. 3 by M. O. or intimate if they would accept V. P. P.

Devotees are requested to intimate promptly any chang their addresses to the Hony. Secy. Mr. S. N. Kharkar, 37, C Road, Thana.

Experiences of Devotees are welcomed for publication in Magazine and should be sent to Editor,


R. V. Ghaisas,
Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg.
Gokhale Rd. North; Dadar, Bombay, 14

२१०७१३९

श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकं ।
प्रादुर्भूत्वाऽत्तमभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥



# संपादकीय

आम्ही गेल्या महिन्यांत पाठविलेल्या अंकाबरोबर ( वर्ष १६-अंक १-२-३ ) मनिऑर्डर फार्म तयार करून साईलीलेच्या वर्गणीदारांकडे पाठविलेले आहेतच. प्रमाणें पुष्कळ भक्तांकडून चालू सालच्या अंकाबद्दल वर्गणी आली. अजूनही कांहीं गेले वर्गणी यावयाची राहिली आहे तरी ती त्यांनीं हा अंक पोंचतांच म. ऑ. आठवून श्रीसमर्थ साईनाथांचे ठिकाणीं असलेलें आपले प्रेम व्यक्त करावे. अंकांत र होत असलेल्या सुधारणेमुळें वर्गणीदारांची संख्या वाढत आहे. त्याचप्रमाणें इलाख्यांतसुद्धां बी. व्ही. एन. स्वामींच्या प्रयत्नाला यश येऊन साईलीलेला वर्गणीदार मिळत आहेत.

भक्तांकडून मिळत असलेल्या पाठिंब्यामुळें आम्हांसही असे वाटतें कीं श्री या चरणी होत असलेली सेवा त्यांना मान्य आहे.

—संपादक

## स्फुट

# श्री साईमहाराजांच्या चरित्राचें रहस्य

( पुण्याचे नामांकित वकील श्री. ल. र. उर्फ तात्यासाहेब गोखले माजी एल्. ए. यांचा हा मननीय लेख वाचकांस सादर करीत आहोंत. संपादक.

१ श्रीसाईबाबांशीं या लेखकाचा प्रत्यक्ष परिचय कधींही जाहला नाही. कांही वर्षांपूर्वी पुणें येथें कै. नानासाहेब चांदोरकर हे रेव्हीन्यू खात्यांत एक श्रेष्ठ अधि होते. त्यांचा माझा कांहीं कारणानें संबंध आला होता व ते मजला साईबाबांच्या वि अनेक हकीगती सांगत असत व शिर्डीस साईबाबांच्या दर्शनास जरूर जावें असें व वार सांगत. परंतु तसा योग आला नाहीं. त्यानंतर माझे दुसरे एक स्नेही ( त्यां नांव मी येथें देऊं इच्छित नाहीं. ) यांचेकडोन बाबांचें चरित्र व चमत्कृती यां ऐकिलें व वाचलें व त्यावरून साईबाबांचें चरित्र मला थोडेबहुत अवगत होऊन बाबांच्या जीवनकर्मांतील रहस्याविषयीं जे माझे विचार ठरत आहेत ते थोडक्यांत प्रदर्शित करीत आहें.

२ साईबाबा हे हिंदु होते अगर यवन होते या विषयींचा एक प्रश्न आहे. परंतु माझ्यामतें या वादांतच त्यांचे चरित्राचे महत्व आहे. हिंदू किं खिस्ती किंवा पारशी, बुद्ध किंवा ज्यू हा भेद कोठपर्यंत राहातो, हें लक्षांत ठेवलें साईमहाराज हे या भेदापलीकडे गेले होते, हें उघड आहे. व अशा तऱ्हेचे न सांपडणारें अनेक संत पुरुष होऊन गेले आहेत. भगवान् परमहंस रामकृष्ण चरित्रांतही ते एक वेळीं खिस्ती झाले होते, एक वेळीं मुसलमान झाले होते व वेळा ते हिंदू. अशा तऱ्हेच्या गोष्टी त्यांचे चरित्रांत आढळतात. जंगलीमहाराज

भक्तांतही कांहीं हिंदू आहेत व कांही मुसलमान आहेत. त्यांची कबर आहे, व समाधिही आहे. सारांश जे उच्च श्रेणीचे पुरुष जीवनमुक्तावस्थेस प्राप्त होतात, त्यांचे ठिकाणी अशा तऱ्हेची भेद दृष्टी कधींही रहात नाहीं. त्यांचा जन्म अमूक जातींत झाला अगर अमूक धर्मांत झाला, हें विचार अत्यंत गौण आहेत. माझ्या समजुतीप्रमाणें साईबाबा हे पूर्ण ज्ञानी, जीवनमुक्त होते. त्यामुळें त्यांच्या चरित्राचा विचार करतांना अपरोक्ष ज्ञानी पुरुषाच्या स्थितीचाच विचार आपण केला पाहिजे.

३ व्यवहारांत अज्ञानी किंवा परोक्षज्ञानी, व ज्ञानी किंवा अपरोक्षज्ञानी असें पुरुषांचे दोन वर्ग होतात. कर्माचा अधिकार यांपैकीं पहिल्या वर्गासच आहे. व भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें कार्याकार्य व्यवस्थिती व शास्त्रविधान हे जे कर्माचे अधिकारी आहेत त्यांचेसाठीं आहे. ( अ. १६ श्लोक २२ ते २४ ) या दृष्टीनें विचार केला असतांना साईबाबांच्या लीलांचा पूर्ण उलगडा होतो. व त्यांतील स्वारस्य लक्षांत येतें. बाबांच्या वृत्तींत स्वच्छंद दिसतो हें अगदीं साहाजिकच आहे. जोंपर्यंत पुरुष कर्म मार्गावर असेल तोंपर्यंत त्यास कर्मानुष्ठानाचें नियम बंधक असतात. व्यवहारांत अनेक प्रकारचीं बंधनें आहेत. धार्मिक बंधनें, नैतिक बंधनें, आचार बंधनें, समाज बंधनें, कर्तव्य बंधनें, हीं सर्व बंधनें व्यावहारीक दृष्टीनें कर्ममार्गी पुरुषांनीं अवश्य संभाळली पाहिजेत. परंतु व्यवहारातून वरच्या श्रेष्ठ कोटींत गेलेले, ज्यांची गणना साधुसंतांत होऊं लागली त्यांचेसंबंधी या बंधनांचा विचार निराळयाच दृष्टीनें केला पाहिजे.

४. " क्षणमिह सज्जनसंगतिरेका भवति भवार्णव तरणे नौका " अशा संतांची क्षणभर संगति संसारसागरातून पार पडण्यास एक नौकाच आहे. ज्यांना साईबाबांची संगति प्रत्यक्ष लाभली नाहीं त्यांनी साईमहाराजांसारख्या संताच्या जीवन चारित्र्याची अप्रत्यक्ष क्षणभर कां होईना संगतीचा लाभ घेणे हा भवसागर तरणेचा सुलभ ाय आहे.

५. साईबाबा हे संत होते. व संत हे शास्त्रांतील विधी निषेधांचें कक्षेतून बाहेर गेलेले असूं शकतात. कौशीतकी उपनिषदांत म्हटल्याप्रमाणें, ज्याला परम तत्व प्राप्त झालें आहे, तो सर्व नियमांच्या पलीकडे गेलेला असतो. असा तत्त्वज्ञानी त्यानें पूर्वी केलेल्या ( पूर्व ) कर्माच्या बंधनातून मुक्त झालेला असतो. फार कशाला अशा ्रुषाची इच्छा व शक्ति म्हणजे भगवंताची इच्छा व शक्ति होय, हें संत जीवनातील ैशिष्ठ्य आहे.

६ एका संतकवीनें म्हटल्याप्रमाणें वस्तुतः मंदीरें व मशिदा ही परमेश्वराच्या ्स्याला झांकणारी स्थळें आहेत. व गुरु व मुर्षिद हे दरवाजावर उभे असून एकप्रकारचा

प्रतिबंध करीत असतात. व परमेश्वराच्या स्थलाला पुराणें, कुराण, तस्यांह, माला, ही जणूं काय एक प्रकारची कुलपेंच आहेत. परंतु परमेश्वरांशीं एक झालेला संत हा सर्वांनाच परमेश्वराप्रत नेणारा असतो. असे या संताचें लक्षण आहे. या दृष्टीनें साईबाबांच्या चरित्राकडे पाहिले पाहिजे.

७. संताचे स्वभावांत भिन्नता असणें सहाजिक आहे, जो संत ज्या देशांत ज्या परिस्थितींत, ज्या दीक्षेमध्यें अथवा वातावरणांत प्रकट होतो, अगर राहातो. त्याचा स्वभाव प्रायः त्याप्रमाणेंच बनतो. तसेंच कित्येक संत एकांत सेवी होऊन लोकसमुदाय सोडून अलग राहातात. कित्येक रात्रंदिवस लोकांत वावरत राहून त्यांना सहाय्य करतात. व त्यांना मार्गदर्शक होतात. ते अन्याय, अत्याचार यांना तोंड देऊन सत्यधर्म स्थापन करण्याचें कामीं गुंतलेले असतात. एतावतः संत निरनिराळ्या स्वभावांचें असणें सहाजिक आहे. व त्यांच्यांत वैचित्र्य असणें हेंही सहाजिक आहे. अशा तऱ्हेचें अनेक मार्गांतील संत सर्व देशांत, सर्व जातींत, सर्व धर्मांत अगर सर्व सांप्रदायांत नेहमीच आढळतात. साखर कोणच्याहि पदार्थांत कोणच्याहि रूपानें असली तरी ती आपले गोडपण कायमच राखते. त्याप्रमाणें कांही संत निवृत्तीपर कांही प्रवृत्तीपर असतात कांही अवधूत वृत्तीचे असतात तरी त्यांचे मार्गदर्शकत्व कायमच असते.

८. याप्रमाणें निवृत्तीपर व प्रवृत्तीपर संताशिवाय दुसरा एक संतांचा वर्ग आहे. त्यांचे बाह्य आचरण बाल, जड, उन्मत्त किंवा पिशाच्यवत् असें होत असतें, असें मानण्यांत येतें. यांना अवधूत असें म्हणतात. हे लोकांस प्रत्यक्ष उपदेश करीत नाहींत अगर दीक्षा देत नाहींत. ते आपल्या ठायींच गुंग अथवा रममाण होऊनच जगतास एक प्रकारचें मार्गदर्शक असतात. परंतु त्यांच्या सान्निध्याच्या योगानेंच लोकांचे अपार कल्याण होत असतें अशा या तिन्ही मार्गांतील विभूती, महाराष्ट्रांतही पुष्कळ होऊन गेल्या आहेत. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, मोरया गोसावी, अक्कलकोटचे स्वामी, काळबोवा, जंगलीमहाराज असे अनेक नांवांचा निर्देश करतां येईल. अर्थात् अनेक पाखंडी लोक यांच्याविषयीं अनेक कुकल्पना करीत असतात. त्यांचा त्याग विचारानें केला पाहिजे.

९ साईमहाराजांचा ज्यांच्याशीं प्रत्यक्ष परिचय होता त्यांना त्यांना साईमहाराजांचा समावेश कोणच्या वर्गांत करावा हें सांगणें शक्य आहे. परंतु माझ्यासारख्यास बाबांच्या समागमाचा लाभ न झाल्यामुळें मला निश्चित असें कांहींच म्हणतां येणार नाहीं ( परंतु जे ऐकतो त्यावरून साईबाबांची गणना संतांच्या वर्गांत करणें अवश्य आहे. हे निसंशय होय.)

१० साईमहाराजांनी अनेक चमत्कार केलेलें विश्वसनीय रीतीनें माहीत असलेमुळें आपल्याला खात्रीनें तें विचारांत घेतले पाहिजेत. संतांचे हातून चमत्कार होतात याचें कारण असें आहे कीं, त्यांचे अंगी अहिंसा सत्य इत्यादि यमनियम पूर्णपणें बाणले असतात. त्यामुळें ते ईश्वररूपांत स्थित झालेले असतात. व म्हणून संतांचें चरित्रांत अलौकीक अशी ईश्वरीकृती आढळणे यांत नवल नाहीं. खुद्द भगवानानी गीतेत आपल्या योग मायेस " ऐश्वर्य योग " असें म्हटलें आहे. म्हणून संतांचें ठिकाणीही अनेक सिद्धी असल्यामुळें त्यांचें हातून चमत्कार होतात. हा त्यांचा अधिकार आहे.

११ जगामध्यें कित्येक दांभिक व धूर्त पाखंडी लोक आपला स्वार्थ साधण्यासाठीं या सिद्धीसामर्थ्याची नक्कल करीत असतात. व लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून आपला नीच स्वार्थी व्यवसाय चालवीत असतात. अशा तऱ्हेचें दांभिक स्वार्थी बेगडी संत या सत्पुरुषाच्यापासून अगदीं निराळे आहेत. वर सांगितल्याप्रमाणें साईमहाराजासारख्या महाविभूती परमेश्वराशी एकात्मभाव पावलेल्या असतात. याच दृष्टीनें साईमहाराजांच्या चमत्कृतीविषयीं विचार केला पाहिजे.

१२. संतांचा महिमा फार मोठा आहे संतापासून ज्ञान संपादन केलें पाहिजे. म्हणजे अशा संत पुरुषाचें समीप जाऊन ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. गीतेंत हें मार्ग अ० ४ श्लोक ७ यांत स्पष्ट सांगितले आहेत. " तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया उपदेक्ष्न्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्व दर्शिनः " याप्रमाणें तत्वदर्शी पुरुषापासून—संतापासून ज्ञान प्राप्त करून घ्यावें. असें भगवान् सांगतात. या पुरुषांच्या देहपातानंतरही त्यांचे चरित्रावरून व लेखावरून ज्ञान प्राप्त करून घेऊन त्याचा विचार केला पाहिजे.

१३ संतांच्या ठिकाणीं समता हा एक मुख्य गुण आहे म्हणून आपले कल्याणासाठीं या संतभावाची प्राप्ती करणें हे प्रत्येकाचें कर्तव्य आहे. व त्यांची अनेक साधनें आहेत. अनेक भक्तिप्रधान ग्रंथांत त्यांचे उल्लेख आलेले आहेत. व साईमहाराजांचें जीवन चरित्रासारखें चरित्र हें ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें मार्गदर्शकच आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत वर्णन केलेले स्थितप्रज्ञ गुणातीत किंवा श्रेष्ठ भगवद्भक्त म्हणजेच संत ति. भगवद्गीतेत सांगितलेल्या संताच्या लक्षणापैकीं अनेक लक्षणें साईबाबांच्या चरित्रांत दिसतात. उदा० तुकाराम महाराजानी म्हटल्याप्रमाणें, " जगाच्या कल्याणा ताच्या विभूती देह कष्टविती उपकारें " ही उक्ती साईमहाराजांविषयी लागू पडणार नाहीं असें कोण म्हणेल ?

१४ संत म्हणजे सत्पुरुष होत. भर्तृहरीनें एके ठिकाणीं सत्पुरुषाची व्याख्या केली आहे. " एके सत्पुरुषाः परार्थ–घटकाः स्वार्थं परित्यज्य ये " याप्रमाणें स्वार्थ-त्याग करून ते केवळ परोपकाराकरितां राहिलेले असतात. तेच सत्पुरुष म्हणजे संत होत. अशी संत या पदाची व्याख्या होईल. व साईबाबांचें जीवन स्वतःकरितां होते ते परोपकारार्थ नव्हते असें कोणासही म्हणतां येणार नाहीं.

१५ तसेंच अनपेक्षतां किंवा निरपेक्षतां, भगवत् परायणता, समदृष्टी, निर्ममत्व, निष्परिग्रह वगैरे अनेक संतांचे गुण आहेत. व या दृष्टीनें साईमहाराजांच्या चरित्राचा विचार केला म्हणजे साईबाबा श्रेष्ठ सत्पुरुष किंवा संत होते असेंच ठरतें.

१६ संतांचें स्थान म्हणजे एक पवित्र स्थळ होय ते पावन करणारें असतें व या न्यायानें साईबाबांचें शिर्डी हे स्थान एक पवित्र क्षेत्र आहे; असें मानणें क्रमप्राप्तच आहे. व अशी क्षेत्रें ही पवित्र म्हणजे पावन करणारी आहेत.

१७ साईबाबांच्या जीवन चरित्राचा जो उलगडा झाला आहे तो संक्षेपतः साई-बाबांच्या भक्तापुढें विचाराकरितां ठेवीत आहे त्याचा ते विचार करोत. पडताळा पाहोत असें त्यांना विनवून " दे हरी संत पदाची जोड " या प्रसिद्ध महाराष्ट्र कवीच्या पदा-तील वाक्यांनीं श्री हरीपाशी सत्पदाची जोड मागून तूर्त संपवितों.

॥ श्री कृष्णार्पणमस्तु ॥

॥ श्रीसाईनाथ ॥

# बाबा व श्रीज्ञानेश्वरी

स्फूट.

## बाबा व भगवान् ज्ञानेश्वर=श्री ज्ञानेश्वरी माई व बाबांचीं वचनें. ज्ञानेश्वर माउलींच्या लीला व बाबांच्या लीला.

आर्या.

" या पुण्य तीर्थ क्षेत्रीं षट्षष्ठी दिव्य वत्सरा पूर्वी ॥
अवतरले श्रीसाई दुसरे श्रीज्ञानदेव या ऊर्वी " ॥

श्रीसाई पुण्यतिथी कीर्तनाख्यान.

शके ११९३ या दिव्य संवत्सरांत भगवान् श्रीज्ञानेश्वरांचा अवतार झाला. सुमारें ५००० वर्षांपूर्वी भारतीय युद्धाचे वेळीं जसा श्रीकृष्ण परमात्मांचे मुखांतून श्रीमदभगवद्गीतादेवींचा अवतार झाला तसाच शके १२१२ या अत्यंत पवित्र व पुण्य संवत्सरांत भगवान् श्री ज्ञानेश्वरांचे वदनांबुजांतून मकरंद सरित्प्रवाहरूपानें श्री ज्ञानेश्वरी माईचा गोड मधुरावतार झाला. शके १६ वें शतकांत पाठभेदानें विकृत स्वरुप झालेल्या ज्ञानेश्वरीईचें श्रीसमर्थ सद्गुरु एकनाथ महाराजांनीं शुद्धिकरण केलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की

श्री ज्ञानेश्वरीची मुळची श्री सच्चिदानंदबाबा हस्तलिखित प्रत अद्याप पावेतों उपलब्ध झालेली नाहींच. पण श्री एकनाथ महाराजांनी शुद्ध केलेली प्रतही उपलब्ध नाहीं. करितां हल्लीं ज्या प्रती उपलब्ध आहेत व ज्या आदित्वाचा (औरसपणाचा) वारसा सांगत आहेत त्यांतच योग्यायोग्यतेचा विचार करून काम भागवून घेण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

वरिल अवतरणांत लिहिल्याप्रमाणें बाबा हे विसावें शतकांतील दुसरें ज्ञानेश्वर व बाबांच्या मुखातील उद्गार व बाबांचें वर्तन म्हणजेच ज्ञानेश्वरी असें प्राकृतविषय विवेचनावरून शनैः शनैः पुढें दिसून येईल.

भगवान् ज्ञानेश्वर विष्णूचा अवतार,

" ज्ञानेशो भगवान् विष्णुः । निवृत्तिर्भगवान्हरः ॥
सोपानो भगवान् ब्रम्हा । मुक्ताख्या ब्रम्हणःकला " ॥

निरंजन माधव.

तर बाबा कृष्ण परमात्माचा अवतार.

श्री द्वारकामाई संशोधनांक श्री सा. ली. वर्ष १४ जोड अंक १-२-३ व विष्णु व कृष्ण एकच-म्हणजे ज्ञानेश्वर व बाबा एकच.

विष्णुर्नारायणःकृष्णो । वैकुंठो विष्टरश्रवाः ॥

अमरकोश श्लो. १९ स्वर्ग वर्ग प्रथम कांड

सुंदर लोकोत्तर व अद्वितीय लोकोपयोगी ग्रंथ निर्माण झाला कीं त्यावर व त्याचे कर्त्यावर विद्वान शास्त्रीपंडिताकडून अनुकूल प्रतिकूल अभिप्राय देण्याची जशी हल्लीं पद्धत आहे तशी पूर्वींही होती.

श्री ज्ञानेश्वरी या अमोल, अतुल व अप्रतिम व्यावहारिक व पारमार्थिक राष्ट्र ग्रंथावर व चिद्रत्न सगुणावतार भगवान् श्री ज्ञानेश्वर महाराजांवर प्राचीन व अर्वाचीन प्रसिद्ध व जगविख्यात संत कवी, विद्वन्मणि शास्त्री-पंडित प्राध्यपकादि राष्ट्रपुरुषाकडून अभिप्राय देण्यांत आले आहेत त्या पैकीं नमुन्यादाखल थोडेसें खालीं देतो.

### अनुष्टुभ् वृत्तम्

प्राचीन १ ज्ञानेशो भगवान् विष्णुः । निवृत्तिर्भगवान्हरः ॥
सोपानो भगवान् ब्रम्हा ॥ मुक्ताख्या ब्रम्हणः कला ॥

निरंजन माधव.

### ओव्या.

२ ॐ नमो श्री ज्ञानेश्वरा ॥ आदिनाथा निराकारा ॥
तुझिया कृपें संसारा ॥ तरलों यया ॥ १ ॥

तूं तत्त्वज्ञानवेत्ता ॥ तूं सकल योगियां सिद्धदाता ॥
तूं मूर्तिमंत ज्ञानतत्वता ॥ भूत ह्रुदयीं ॥ २ ॥

तूंचि भवसिंधूचें तारूं ॥ तुझेनि नामस्मरणें साचारूं ॥
देखती पैलपारू ॥ अज्ञान जीव ॥ ३ ॥

ज्ञानेश्वर हीं चार अक्षरें ॥ जो जपकरी निर्धारें ॥
त्यासी ज्ञान होय सत्वरें ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ४ ॥

श्री एकनाथ महाराज.

### अभंग.

३ तिन्हीं देव जैसें परब्रम्हिचे ठसे । जगीं सूर्य जैसें प्रगटलें ॥ १ ॥
धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान । धन्य तो निधान ज्ञानदेव ॥ २ ॥
उपजतां ज्ञानी हें वर्म जाणोनी । आलें लोटांगणी चांगदेव ॥ ३ ॥
प्रत्यक्ष पैठणीं भट्टीं केला वाद । रेड्यामुखीं वेद बोलविले ॥ ४ ॥
सोहं सुकृताच्या सोडोनिया गांठी । केलीस मराठी गीतादेवी ॥ ५ ॥
नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे । एक वेळ जाईजे अलकापुरी ॥ ६ ॥

श्री नामदेव महाराज.

### ओवी

४ तारावया जग समग्र। पुन्हा अवतरला रमावर । गीतार्थ केला साचार

तो ज्ञानेश्वर जगद्गुरु ॥ १ ॥

श्री श्रीधर ( रामविजय कर्ते )

## ओव्या.

५ प्राकृत कविश्वराचार्य । ज्ञानदेव ज्ञानैकवर्य ।
जयाचें बुद्धीचें गांभीर्य । अगाध सिंधू सारिखें ॥ १ ॥
त्याचें चरण चिंतिलें मनीं । तेणें पावन झालों जनीं ।
मातृजनक जनार्दनीं । एकनाथ नमियेला ॥ २ ॥

श्री मुक्तेश्वर.

## अभंग.

६ ज्ञानियांचा राजा गुरुमहाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसे तुम्हा ॥ १ ॥
मज पामरा हे काय थोरपण । पायींची वहाण पायीं बरी ॥ २ ॥
ब्रम्हादिक जेथें तुम्हां ओळखणें । इतर तुळणें काय पुरे ॥ ३ ॥
तुका म्हणे नेणें युक्तीचे ते खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई॥४॥

श्री तुकाराम महाराज.

## आर्या.

७ श्री ज्ञानदेव साक्षाद्भगवान् वैकुंठनाथ अवतरला ॥
एतत्कृत गीतार्थ व्याख्यानें लोक फार भवतरला ॥ १ ॥
भाषाग्रंथीं याची तुला नये आणिकासि या लोकीं ॥
प्रतिभा घरू करातें कविधर्म हि सर्व किंकरचि हो कीं ॥ २ ॥
कोणा जडा न होईल, सुगतिप्रद जाहलासि भितीतें ॥
श्रीरामाचें तैसें तव यश सज्जन समाज चिंतीते ॥ ३ ॥
श्रीमद्भगवद्गीता व्याख्या केली जगासि ताराया ॥
साराया सद्ग्रंथा सेविति संसारताप साराया ॥ ४ ॥
ज्ञानेशा त्वत्कृतिते करिति ज्ञातें समस्त ही प्रणती ॥
ज्ञानेश्वरी भवानी, होय महा मोह महिष हे म्हणती ॥ ५ ॥

श्री मोरोपंत.

पद.

८ शुकसनकादिक माहिमा ज्याचा वर्णिति वेद पुराणें रे ॥ गोकुळीं गोंवळ होऊनि गाई चारी चक्रपाणी रे ॥ जो हा पांडव घरिं हरि सारथि पाजी तुरगा पाणी रे ॥ तो हा सद्गुरु ज्ञानेश्वर हरि, स्मरणें तारी प्राणी रे ॥ १ ॥ ज्यानें केली भगवद्गीते वरती सुंदर टीका रे॥ सादर परिसति होती त्यांची संसारांतुनि सुटका रे ॥ प्राकृत भाषा रुचिकर रचिली करुनि सुधारस फिक्का रे ॥ भक्ति ज्ञान विरक्तिचाहि पोषी तो रस निक्का रे॥ २ ॥ दगडाची ही भिंति जयानें चालविली जड माती रे ॥ पैठाणीं दिधली वेद परीक्षा, वेड्या रेड्या हातीं रे ॥ सुवर्णाचा पिंपळ ज्याच्या द्वारीं वैष्णव पाहति रे ॥ अजान वृक्षाखालीं शांभव आसन घालुनि रहाती रे ॥ ३ ॥ मुक्तपुरीहुनि श्रेष्ठ पुरातन पाहति क्षेत्र आळंदी रे ॥ इंद्रायणीचें जळ जो सर्वां, इंद्रपदासि हि निंदी रे ॥ ज्याचें संन्निध सिद्धेश्वर तो सन्मुख शोभे नंदी रे ॥ कार्तिकमासी पंढरपुर पति समाधि ज्याची वंदी रे ॥ ४ ॥ ज्ञानेश्वर या नांवाचा जो जप करि अनुदिनि वाचें रे ॥ त्याचे हृदयीं परमेश्वर तो लक्ष्मी घेउनि नाचे रे ॥ ज्याची टीका श्रवणीं पडतां भवभय पर्वत कांपे रे ॥ अगणित गुणगण मध्व मुनीश्वर वर्णितो हे वाचें रे॥५॥

श्री मध्वमुनीश्वर.

९ भगवद्गीतेवरी टीका ॥ केली भावार्थदीपिका ॥

अमृत अनुभव करूनि निका ॥ योगवासिष्ठ स्वात्मपत्र ॥

विसोबा खेचर

श्री ज्ञानेश्वर महाराजांचे योगवासिष्ठ.

चांदोरकर प्रस्तावना.

वरील अभिप्रायांत कविश्रेष्ठांनीं ज्ञानेश्वरास ब्रम्हा, विष्णु, महेष, कृष्ण वगैरे नामांनीं यथार्थ वर्णिलें आहे. व बाबा म्हणजे विसावें शतकांतील ज्ञानेश्वर असें म्हणण्यानें श्री द्वारकामाई संशोधनांत त्यांना विसावें शतकांतील कृष्णावतार असें म्हटलें आहे, या

म्हणण्यास बाध येत नाहीं. उलट बळकटीच येते.

आपण गिरनारला लहानपण घालविले. मग आपण अबूच्या पहाडावर आलों, तेथून माहुरास आलों, तेथून गाणगापुरास आलों, तेथून अक्कलकोटास आलों, तेथून मग दौलताबादेस आलों तेथें आपल्यास एक जन्या भेटला. त्यानें आपली फार चांगली सेवा केली.

१ प्रस्तुतची ज्ञानेश्वरी ( राजवाड्यांना मिळालेली मुकुंदराजी अर्वाचीन प्रत ) म्हणजे ज्ञानेश्वरांनीं खुद्द नेवाशास भाषेच्या ज्या स्वरूपांत ती सांगितली त्याच स्वरूपांत तंतोतंत छापलेला हा महाराष्ट्र वाङ्मयांतील बहुमोल ग्रंथ होय. आधीच एकनाथी ज्ञानेश्वरीनें ज्या महाराष्ट्रीय समाजास आज अनेक शतकें आपल्या गुणानी मोहित करून सोडलें आहे, त्यांस खुद्द ज्ञानेश्वरी मिळणें म्हणजे अपूर्व लाभ होय. यांत शंका नाहीं. भगवद्गीतेवरील उत्कृष्ठ मराठी टीका, वारकरी पंथाची जननी, मनोहर उपमा दृष्टांतांनी गजबजलेलें उत्तम काव्य, आणि सहाशें वर्षांपूर्वीच्या नागर मराठीचा नमुना, व मराठींत कागदावर लिहिलेला सर्वांत जुना उपलब्ध लेख, या सर्व दृष्टींनीं ज्ञानेश्वरीच्याच अस्सल भाषेंत छापलेला हा ग्रंथ महाराष्ट्रीयांच्या आदरास, कौतुकास, व आश्रयास पात्र होईल यांत संदेह नाहीं.

केसरी दिनांक २५--८--०८

२ एकाच शब्दानें सांगावयाचें म्हटलें, तर महाराष्ट्र ग्रंथ संग्रहालयांत ही ज्ञानेश्वरीची प्रत केवळ " अमूल्य " आहे. भाषा राजदरबारी अत्यंत शुद्ध अनुपमेय प्रौढ व नागर मराठी आहे. ज्ञानेश्वरांनीं ओंवीबंधांत ज्ञानेश्वरी अशी रचिली कीं मूळ संस्कृत श्लोक मुळींच न दिला तथापि व्याख्यानाच्या ओघाला तुटकपणा येऊं नये. (सन १९०९)

प्रसिद्ध इतिहास संशोधक

**वि. का. राजवाडे**

मुकुंदराजी ज्ञानेश्वरी प्रस्तावना.

३ या ( भक्तिमार्ग ) सांप्रदायाचा गीतेवरील मराठी पण उत्तम ग्रंथ म्हटला म्हणजे ज्ञानेश्वरी हा होय.

(१) यांत गीतेच्या अठरा अध्यायांपैकीं पहिल्या चोहोंत कर्म, दुसऱ्या सातांत उपासना व पुढील अध्यायांतून ज्ञान प्रतिपाद्य आहे असें म्हटलें असून,

(२) आपण आपली टीका " भाष्यकारातें वाट पुसत [ शंकराचार्यास ] " रचिली असें ज्ञानेश्वरांनीं स्वतः आपल्या ग्रंथाच्या अखेरीस म्हटलें आहे. तथापि गीतेचा अर्थ अनेक दृष्टांतांनी फुलवून सांगण्याची ज्ञानेश्वर महाराजांची शैली अलौकिक असून श्री शंकराचार्यांपेक्षां विशेषतः भक्तिमार्गाचें

(३) व कांहीं अंशीं निष्काम कर्माचे ही समर्थन केलें असल्यामुळें, ज्ञानेश्वरी हा गीतेवरचा एक स्वतंत्र ग्रंथ मानिला पाहिजे.

(४) ज्ञानेश्वर महाराज हे स्वतः योगी होते. म्हणून गीतेच्या सहावे अध्यायांत पातंजल योगाभ्यासाचा विषय ज्या श्लोकांत आला आहे त्यावर त्यांची टीका विस्तृत असून त्यांचे असें म्हणणे आहे कीं अध्यायाच्या शेवटी "तस्माद्योगी भवार्जुन" यासाठीं हे अर्जुना! तूं योगी म्हणजे योगाभ्यासांत प्रवीण हो [गी. ६–४६] असें अर्जुनास सांगून सर्व मोक्षपंथांत पातंजल योगासच भगवंतानी " पंथराजु " सर्वोत्तम पंथ ठरविलें आहे.

लोकमान्य बा. गं. टिळक<br>
गीता रहस्य पान १८ ओळी १७<br>
पासून २० पर्यंत सन १९१५ शके १८४६.

वरील प्राचीन ९ व अर्वाचीन २ अभिप्रायाबद्दल मला कांहीं लिहावयाचें नाहीं. फक्त लोकमान्यांनीं श्री ज्ञानेश्वरीवर अभिप्राय दिला आहे त्या ३ रे अभिप्रायाबद्दल माझ्या अत्यल्प समजुतीप्रमाणें केवळ गैरसमज दूर करण्याकरतांच दोन शब्द लिहित आहे. लोकमान्य हे माझे पुणें नूतन आंग्ल विद्यापीठ (न्यू इंग्लिश स्कूल) मधील एक अत्युत्कृष्ट व अद्वितीय अध्यापक व ( फरग्यूसन कॉलेज ) फरग्युसन महाविद्यापीठातील अप्रतिम प्राध्यापक होते. प्रत्येक विषयांत त्याच्या असामान्य विद्वत्तेबद्दल अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल व अतुल पारंगततेबद्दल वाद नाहीं ते मला अत्यंत पूज्य व वंदनीय होते व आहेत.

१ श्रीमद्भगवद्गीतेच्या अठरा अध्यायांच्या विषयांची संगती गीता रहस्यांत १८ वे पानावर श्री ज्ञानेश्वर महाराजांची म्हणून जी दिली आहे ती तशी नसून अगदीं निराळी आहे व ती भगवान ज्ञानेश्वर माउलींनीं स्वतः १८ वें अध्यायातील ६६ वें श्लोकावरील भाष्यांत १४३५ व ओवीपासून १४४८ वे ओवी पर्यंत व नंतर १४५२ वे ओवीपासून १४५५ वे ओवीपर्यंत स्पष्ट दिली आहे. ती अशी.

१ ला अध्याय शास्त्रप्रस्तावना. २ रा सांख्य सद्भाव.( मोक्षदानीं स्वतंत्र ज्ञान-प्रधान हे शास्त्र ) सूत्राची उभारणी. ३ रा कर्मकांड. चवथा, ५ वा, ६ वा, ७ वा, ८ वा, ९ वा, १० वा व ११ वा ही अष्टाध्यायी म्हणजे उपासना किंवा देवताकांड. नंतर १२ वे अध्यायापासून १५ वे अध्यायापर्यंत ज्ञानकांड. ज्ञानाला वैर करणारा अज्ञान ( असुरी संपत्ती ) असुर वर्ग प्रतिपादन. हा १६ वा अध्याय. शास्त्र प्रमाण मानून त्याच्याच सहाय्यानें वैरी जिंकणें हा १७ वा अध्याय. पहिले अध्यायापासून सतरावे अध्यायापर्यंत सर्व अर्थाचे संक्षिप्त एकीकरण (summing up) हा शेवटचा १८ वा कलशाध्याय.

१ ( १ ) श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं जी ज्ञानेश्वरी लिहिली ती आचार्य भाष्याच्या मदतीनें लिहिली असा ज्ञानेश्ववरमहाराजांवर लोकमान्यांचा आक्षेप आहे. व त्यास सबळ पुरावा म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांच्या मुखांतलेच ते शद्ब देतात " तैसा व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकारातें वाट पुसतु । अयोग्यही मी न पवतु । कें जाईन ॥ १७२२ ॥ अ. १८ ज्ञानेश्वरमहाराजांनीं वरील ओंवींत तसें म्हटलें आहे हे खरें. पण त्या ओवींचा अर्थ कसा लावावयाचा ? ज्ञानेश्वरमहाराजांस ज्ञानेश्वरी लिहिण्यास खरोखरीच भाष्यांची जरूर होती कां ? ज्यांच्या ओंठावरचा जार सुकला नाहीं, जे कधींही विद्यापीठांत अगर महाविद्यापीठांत गेले नाहींत व जे कधीं विद्यार्जनाकरतां कोणत्याही गुरुगृहीं किंवा गुरुकुलीं राहिले नाहींत, अशा त्या कोंवळया बालकांनीं आपल्या वयाच्या अवघ्या १९ वे वर्षी श्री मद् भगवद्गीतेसारख्या कठीण वेदांत गीर्वाण ग्रंथावर भावार्थदीपिका-श्री ज्ञानेश्वरी-नांवानें प्रसिद्ध असलेलें भाष्यरूपीं स्वतंत्र, जगन्मान्य, भक्ति, ज्ञान, वैराग्यपूर्ण काव्य लिहावें व विश्वास थक्क करून सोडावें हें " भाष्यकारातें वाट पुसत ', याचें फल खचित नाहीं असें वाटतें.

" तैसी दशेची वाट न पाहातां ॥ वयसेचिया गांवा न येतां ॥
बाळपणींच सर्वज्ञता ॥ वरी तयातें ॥ ४५३ ॥
तियें सिद्ध प्रज्ञेचिये लाभें ॥ मनचि सारस्वतें दुभे ॥
मग सकळशास्त्रें स्वयंभें ॥ निघती मुखें ॥ ४५४ ॥
" तैसे दुर्भेद जे अभिप्राय । का गुरुगम्य हुन ठाय । तेथ सौरसेवीण जाय ।
बुद्धि तयाची ॥ ४५९ ॥
श्री ज्ञानेश्वरी अ. ६

श्री ज्ञानेश्वर महाराज हे पूर्ण ज्ञानी व योगी होते. व योगसिद्धी झाल्यानंतर दशा किंवा वयाची वाट न पाहतां त्या योग्याचे मुखांतून सर्व शास्त्रें स्वयंभून निघतात. त्यास कोणाची व कशाचीही जरूर लागत नाहीं हें वरील ओंव्यांत त्याच ज्ञानेश्वर महाराजांनीं सुरस वर्णन केलें आहे.

( २ ) याचप्रमाणें ज्ञानेश्वर महाराजांवर गुरुकृपा अपार होती व त्यामुळें त्यांचा आत्मविश्वासही दांडगा होता. महाराज लिहितात--

" जे तान्हे नि मिथा अपत्यें ॥ आणि माझे गुरु एकलौते ॥
म्हणोनि कृपेसि एक हातें ॥ जाले तिये ॥ ९९ ॥
म्हणोनि रिकामें तोंड ॥ करूं गेलें बडबड ॥
कीं गीता ऐसें गोड ॥ आतुडलें ॥ २१ ॥
श्री ज्ञानेश्वरी अ. १५

सर्व गुरुकृपेचा वारसा ज्या एकुलत्या एक तान्ह्या अपत्याकडे येतो व ज्याच्या रिकाम्या वेळच्या तोंडाच्या बडबडींत सुद्धां भावार्थदीपिके सारखे गोड ( व स्वतंत्र ) मराठी गीताशास्त्र निर्माण होतें त्या अपत्य ज्ञानेश्वर महाराजांस " भाष्यकारातें वाट पुसत " भाष्यकाराच्या मदतीची जरूर होती कां ? निशुद्धी नव्हती. मग त्यांनीं असें कां लिहिलें ?

हें लिहिणें म्हणजे साक्षान्नारायण स्वरूपी महर्षि व्यास व हिंदुधर्मरक्षक विद्वन्मणी शंकराचार्य वगैरे आर्यावर्तांसच नव्हे तर अखिल ज्ञात विश्वास आपल्या विद्वत्तजानें दिप-विणाऱ्या महनीय विभूतींचा केवळ मोठेपणा कायम राखण्याकरतां, त्यांचा गौरव करून त्यांना योग्य तो मान देण्याकरतां व अनौद्धत्य व निरभिमान शालीनता दर्शविण्या-करतां आहे. आचार्य भाष्यकाराच्या मदतीकरतां नव्हे.

( ३ ) महाराष्ट्रांतील एक विद्वान संतवाङ्मय प्रेमी व चिकित्सकही ज्ञानेश्वर महा-राजांच्या योगवासिष्ठाबद्दल व ज्ञानेश्वरीबद्दल असेंच लिहितात.

" हें बोलिलें वसिष्ठ ॥ म्हणोनि नांव वासिष्ठ ॥ "

स्वतंत्र ग्रंथ तर करावयाचा. परंतु पूर्वील महर्षीस स्तुतिपुष्पें प्रथम वाहून नंतर रचना करा-यची. हें शालीनतेचें उदाहरण मननीय आहे. त्याचप्रमाणें आपली लीनता प्रकटवीत व " भाष्यकारातें वाट पुसत " असें म्हणत स्वतंत्र रचनेस प्रारंभ करावयाचा. त्यांतील लीनतेचें कौतुक करावयाचें कां अगाध विद्वत्तेनें आश्चर्यचकित व्हावयाचें !

गोविंद काशिनाथ चांदोरकर.
सत्कार्योत्तेजक सभा, धुळें.

( ४ ) जेव्हां श्री सुकेशा, शैब्य, सौर्यायणी, कौसल्या, भार्गव व कात्यायन असे ६ ब्रह्मपर व ब्रह्मनिष्ठ विद्यार्थी ब्रह्माचा शोध करीत करीत भगवान श्री पिप्पलाद आचार्यांच्या आश्रमांत पूर्ण ब्रह्माचें यथार्थ स्वरूप समजावून घेण्याकरितां प्रवेश करते झाले तेव्हां भगवान ऋषि म्हणाले एक वर्षपर्यंत येथें राहून ब्रम्हचर्यव्रत पाळून श्रद्धापूर्वक सेवा करून मग स्वेप्सित प्रश्न विचारा. नंतर मग आम्हास जर उत्तरें विदित असतील तर ती आम्ही तुम्हास सांगूं.

" तान्ह स ऋषिरुवाच, भूय एव तपसा ब्रम्हचर्येण श्रद्धया
संवत्सरं संवत्स्यथ, यथाकामं प्रश्नान्पृच्छत, यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति. " ॥

यांत " यदि " हें शालीनतादर्शक पद आहे. अज्ञान किंवा संशयदर्शक नाहीं.

" यदि " यावर आचार्य भाष्य–

" अनुद्धतत्व ( शालीनता ) प्रदर्शनार्थो " यदि " शब्दः नाज्ञान संशयार्थः प्रश्न निर्णया ( त्×अ ) दवसीयते। सर्वं ह वः पृष्ठं वक्ष्याम इति " येथें यदि=जर हा शब्द शालीनतादर्शक आहे. अज्ञान किंवा संशय प्रदर्शनार्थ नाहीं. कारण पुढें शिष्यांनीं जे प्रश्न विचारले त्यांचीं साग्र व समग्र उत्तरें मुनींनी सहज देऊन शिष्यांच्या संशयाचा निरासपूर्वक निर्णय केला. भगवान् पिप्पलादांचें बोलणें (यदि) केवळ उपचार, शालीनता, व विनयपूर्ण आहे.

( ३ ) श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं विशेषतः भक्तिमार्गाचें व कांहीं अंशीं निष्काम कर्माचेंही समर्थन केलें आहे असें रहस्यकार लिहितात. पण श्री ज्ञानेश्वरींतील खालीं दिलेल्या अवतरणावरून ज्ञानेश्वर महाराजांनीं निष्काम कर्मयोगाचें समर्थन पूर्णपणें केलें आहे. व १८ वे अध्यायांत तर या समर्थनाचा कळस झाला आहे असें दिसून येईल.

" कर्माधारें राहाटिजे । परी कर्मफळ न निरीक्षिजे ।
जैसा मंत्रज्ञुन बधिजे । भूतबाधा ॥ २३४ ॥

आम्हीं समस्त ही विचारिलें । तव ऐसेंचि हें मना आलें ।
जें न सांडिजें तुवां आपलें । विहित कर्म ॥ २६५ ॥

परि कर्मफळीं आस न करावी । आणि कुकर्मीं संगति न व्हावी ।
हें सत्क्रियाचि आचारावी । हेतु वीण ॥ २६६ ॥

श्री ज्ञा. अ. २

१ " कां प्राप्तकर्म सांडिजें । येतुले नि नैष्कर्म्या होईजे ।
हें अर्जुना वाया बोलणें । मूर्खपणें ॥ ४६ ॥

२ जंव निरार्तता नाहीं । तंव व्यापारु असे पाहीं ।
मग संतुष्टीच्या ठायीं । कुंठे सहज ॥ ४९ ॥

३ म्हणोनि आइके पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था ।
तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ५० ॥

४ हें न ठकेचि जरी कांहीं । तरी सांडिलें तें कांयी ।
म्हणोनि कर्म त्यागु नाहीं । प्रकृतिमंता ॥ ५८ ॥

५ तैसें प्रकृति आधारें । कर्मेंद्रिय विकारें ।
निष्कर्म्यु ही व्यापारें । निरंतर ॥ ६२ ॥

६ म्हणुनि संगु जंव प्रकृतीचा । तंव त्यागु न घडे कर्मांचा ।
ऐसियाही करूं म्हणती तयांचा । अग्रहो चि उरे " ॥ ६३ ॥

७ म्हणोनि जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।
तें कर्म हेतु रहित । आचार तूं ॥ ७७ ॥

८ म्हणवुनि तूं नियतु । सकळ काम रहितु ।
होऊनिया उचितु । स्वधर्मे राहटे ॥ १५० ॥

९ जे स्वधर्मे निष्कामता । अनुसरले पार्था ।
ते कैवल्य परतत्वता पातलें जगीं ॥ १५१ ॥

१० देखे प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावलें ।
तयांही **कर्तव्य असें उरलें । लोकालागीं ॥ १५५ ॥**

११ हें ऐसें असे स्वभावें । म्हणोनि कर्म न संडावें ।
**विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ १५९ ॥**

१२ म्हणोनि समर्थ तो येथें । आर्थिला सर्वज्ञते ।
तेणें सविशेषें कर्मातें । त्यजावें ना ॥ १६८ ॥

श्री ज्ञा. अ. ३

" जो सकळ कर्मी वर्तता । देखे आपली नैष्कर्म्यता ।
कर्मसंगें निराशता । फळाचिया ॥ ९३ ॥

आणि कर्तव्यते लागीं । जया दुसरें नाहीं जगीं ।
ऐसिया नैष्कर्म्यता तरी चांगी । बोधला असे ॥ ९४ ॥

आणि उदो अस्ताचे नि प्रमाणें । जैसे न चलता सूर्याचें चाळणें ।
तैसें नैष्कर्मत्व जाणें । कर्मीची असतां ॥ ९९ ॥

श्री ज्ञा. अ. ४

तरी जाणां नेणां सकळां । हा कर्मयोगु कीं प्रांजळा ।
जैसी नांव स्त्रियांबाळा । तोय तरणीं ॥ १६ ॥

अगा करिते न वीण कर्म । तेंचि तें निष्कर्म ।
हें जाणती सवर्म । गुरु गम्य जें ॥ ६३ ॥

श्री ज्ञा. अ. ५

" तैसें अन्वयाचे नि आधारें । जातीचेनि अनुकरें ।
जें जेणें अवसरें । करणें पावें ॥ ४५ ॥

तें तैसेंचि उचित करी । परी सांटोप नोहें शरीरीं ।
आणि बुद्धीही करोनी फळवेरी । जायेचि ना " ॥ ४६ ॥

श्री. ज्ञा. अ. ६

" कर्मेंद्रियें सुखें । करितीं कर्में आशेखें ।
जियें कां वर्ण विशेखें । भागा आलीं ॥ ७६ ॥

विधीते पाळीत । निषेधाते गाळीत ।
मज देऊनि जाळित । कर्म फळें ॥ ७७ ॥

ययावरी पाहीं । अर्जुना माझें ठायीं ।
संन्यासूनि नाहीं । करितीं कर्में ॥ ७८ ॥

आणि जेणें जेणें वेळें । घडतीं कर्में सकळें ।
तयांचीं तियें फळें । त्यजितु जाय ॥ १२८ ॥

अगा आत्मजेच्या विषीं । जीवु जैसा निरभिलाषी ।
तैसा कर्मीं अशेषीं । निष्कामु होय " ॥ १३२ ॥

श्री. ज्ञा. अ. १२

" तैसी नोलांडितां कर्मरेखा । चित्त देइजे नित्यनैमित्तिका ।
फळा किजे पाठीं अशैखा । वाताचे वानी ॥ १२५ ॥

मन शुद्धीच्या मार्गी । जैं विजयी व्हावें वेगी ।
तैं कर्म सबळां लागीं । आळसु न कीजे ॥ १३९ ॥

जें चालणें वेगावत जायें । तो वेगु बैसावयाचि होये ।
तैसा कर्मातिशयो आहे । नैष्कर्म्या लागीं ॥ १५४ ॥

तैसें कर्में कर्म बद्धता । मुमुक्षु सोडविलें पंडुसुता ।
जैसा रस रीति मरतां । राखिला विषें ॥ १६३ ॥

म्हणोनि फळीं लागु । सांडोनि देह संगु ।
कर्में करावीं हा चांगु । निरोपु माझा ॥ १७६ ॥

तरी स्वाधिकाराचे नि नांवें । जें वांटिया आलें स्वभावें
तें आचरे विधि गौरवें । शृंगारोनी ॥ २०० ॥

परी हें मी करितु असें । ऐसा आठवू त्यजी मानसें ।
तैसें चि पाणी दे आशे । फळाचियें ॥ २०१ ॥

आणि हा गा सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची ।
खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ॥ २१८ ॥

तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी । परी फळ न सूयें दिठीं ।
उखिती क्रिया पैठी । ब्रम्हचि करी ॥ ५९० ॥

किंबहुना ऐसें निखिळ । मी पण जोडे तया फळ ।
सेवूनि वेली वेल्हाळ । कर्म योगाची ते ॥ १२१८ ॥

पैं कर्मयोगा कीरिटी । चक्रवर्तीच्या मुकुटीं ।
मी चिद्रत्न ते साटो वाटी । होय तो माझा ॥ १२१० ॥

कीं कर्मयोग प्रासादाचा । कळस जो हा मोक्षाचा ।
तयावरील अवकाशाचा उवावो जाला तो ॥ १२२० ॥

नाना संसार आडवीं । कर्मयोग वाट बरवी ।
जोडली ते मदैक्य गांवीं । पैठी जालीसे ॥ १२२१ ॥
हें असे कर्मयोग बोधें । तेणें भक्तिचिद्रंगें ।
मी स्वानंदोदधि वेगें । ठाकिला कीं गा ॥ १२२२ ॥
हा ठायवरी सुवर्मा । कर्मयोगा आहे महिमा ।
म्हणोनी वेळोवेळीं तुम्हा । सांगतो आम्ही ॥ १२२३ ॥

श्री. ज्ञा. अ १८

वरील व अशाच प्रकारचीं निष्काम कर्मयोगाचें पूर्णपणें समर्थन केल्याचीं आणखी कितीतरी उदाहरणें श्री ज्ञानेश्वरींत सांपडतील.

" तस्माद्योगी भवार्जुन " यासाठीं हे अर्जुना, तूं योगी म्हणजे योगाभ्यासांत प्रवीण हो असे अर्जुनास ( गीता अ. ६ श्लो. ४६ ) सांगून सर्व मोक्षपंथांत पातंजल योगासच भगवंतांनीं " पंथराजु " सर्वोत्तम पंथ ठरविलें आहे. म्हणजे कर्मयोगास कमी महत्त्व दिलें आहे, असा हा आक्षेप आहे.

कर्मयोगाला, कामक्रोधादि शत्रु जे मनुष्यांचीं इंद्रियें मन आणि बुद्धि यांत बिऱ्हाड करून त्याच्या ज्ञान विज्ञानाचा नाश करतात. त्यांचा जय करण्याकरतां ( म्हणजे त्यांचें उच्चाटन करण्याकरतां ) इंद्रिय निग्रहाची अवश्य जरूर लागते. आतां कर्मयोगास अवश्य लागणारी जी ही निःसंग किंवा ब्रह्मनिष्ठ स्थिती ती ज्या साधनांनी प्राप्त होऊं शकते त्यांच्या निरूपणास म्हणजे पातंजल योगाभ्यासास या अध्यायांत ( ६ वे अध्यायांत ) सुरवात केली आहे वगैरे.

गीतारहस्य अ. ६ पान ६९३.

यावरून असें स्पष्ट दिसतें कीं कर्मयोगाला ज्या साधनांची जरूर आहे त्या साधनांत ( इंद्रियनिग्रह—पातंजल योग ) हा मार्ग अत्यंत थोर आहे म्हणजे "पंथराज" आहे. म्हणजे या मार्गावांचून इतर कोणत्याही मार्गांनीं कर्मयोग यशस्वी होणें शक्य आहे.

कर्मयोग व ज्ञानयोग हे दोनच मुख्य मार्ग स्वतंत्रपणें मोक्षाला कारणीभूत आहेत. तसें स्वतंत्रपणें पातंजलयोग किंवा भक्तियोग नाहीत. हे दोन योग

वरील दोन योगास सहाय्यक म्हणून आहेत हें ज्ञानेश्वर महाराजांना व रहस्य-कारांना मान्य आहे.

आतां कर्मयोगापेक्षां पातंजलयोगच श्रेष्ठ ( पंथराजु ) आहे असेंच जर ज्ञानेश्वर महाराजांचें म्हणणें असतें तर त्यांनीं कर्मयोगाचें महत्त्व अठरावे अध्यायापर्यंत वर्णिलेंच नसतें. व १८ वे अध्यायांत त्या महतीचा कळसही केला नसता.

तूं योगी हो म्हणजे फक्त अंतःकरणानें योगी हो म्हणजे लढाई कर. पण कर्मकर्तृत्वाचा अहंकार व फलाशा सोडून सर्व कर्मे परमेश्वराला अर्पण कर असा अर्थ दिसतो. योगी होऊन निरंतर ब्राम्ही स्थितींतच रहा असा अर्थ दिसत नाहीं. तूं योगी कसा हो हें स्पष्ट ज्ञानेश्वर महाराजांनीं खालील ओंवीत दिलें आहे.

" म्हणौनि या कारणें । तूतें मी सदा म्हणें । योगी होय " अंतःकरणें " पंडुकुमरा ॥ ४८१ ॥ श्री ज्ञा. अ. ६.

श्रीमद्भगवद्गीतेच्या पांचवे अध्यायांतील शेवटचे श्लोकभाष्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं केवळ अर्जुनाचे आग्रहावरून त्याचे समजुतीसाठीं श्रीकृष्ण परमात्म्यांनी हा योग–पातंजल योग अर्जुनास सांगितला. त्यानें अनुष्ठावा म्हणून नव्हे.

" येऱ्हवीं तरी अवधारा । जो दाविला तुम्ही अनुसारा ।
तो पव्हण्याहूनि पाय उतारा । सोहपा जैसा ।। १६५ ।।
तैसा सांख्याहूनि मांजळा । आम्हा सारिखियां अबळां ।
येथ आहे कांहीं परि काळा । तो साहो ये वर ।। १६६ ।।
म्हणोनि एक वेळ देवा । तोचि पडताळा घेवावा ।।
विस्तारेल तरी सांगावा । साद्यंताचि " ।। १६७ ।।

श्री. ज्ञा. अ. ५

हा योग सांगितल्यावर तो मजकडून होणार नाहीं कारण सांख्य ( ज्ञान ) योग व कर्मयोग यांचेमधील म्हणजे बाहुबलानें समुद्र तरून जाणें किंवा स्त्रियांबाळांसह नावेंत बसून समुद्र तरून जाणें यापेक्षां पातंजल योगानें म्हणजे पायउतारानें समुद्रांतून पर-तीरास जाणें, असा हा योग आहे असें प्रथम मला वाटलें होतें पण तो मजकडून होणार नाहीं असी अर्जुनानें खालील ओंवींत कबुली दिली आहे.

" म्हणोनि मन एक निश्चळ राहेल । मग आम्हांसि साम्य होईल ।
हें विशेषें ही न घडेल । याचि लागी ॥ ४१७ ॥

श्री ज्ञा. अ. ६.

म्हणूनच अर्जुनाला शेवटीं तूं अंतःकरणानें योगी हो. शरीरानें होऊं नकोस असा वरलि ६ वे अध्यायाच्या ४८१ वे ओवींत उपदेश केला आहे असें दिसतें.

वरील विवेचनांत बाबांचें ज्ञानेश्वर महाराजांशीं पुष्कळ साम्य येतें. तें पुढील खेपेस यथामति दाखवीन.

ठाणें, वैशाख शु॥१ शके १८६१.
दिनांक २० एप्रिल १९३९.

—बाबांचें बाळ

# श्री सद्‌गुरु साईनाथ सेवा संस्था

# अहवाल

## भिवपुरी रोड, ता. कर्जत; जि. कुलाबा.

ऑफिस—२९।३० शिवाजीपार्क हाऊस
२५१ लेडी जमशेटजी रोड, माहीम
मुंबई नं. १६.

ता. २७-१२-३९

श्री साईनाथ प्रसन्न

श्रीयुत रा. रा. श्री. ना. खारकर ऑ. चिटणीस, श्री साईबाबा शिरडी संस्थान यांसी सप्रेम नमस्कार.

आपल्या माहितीकरितां सोबत वरील संस्थेच्या घटना–नियमांची नक्कल (अलाहिदा) पाठवित आहोंत. त्यावरून आपणांस एकंदर साधारण संस्थेसंबंधीं बोध होईलच. तसेंच या संस्थेचा अहवालात्मक इतिहास सोबत "श्री साईलीला" मासिकांत प्रसिद्ध करण्याकरतां पाठवित आहोंत. तरी तो आपण कृपाकरून प्रसिद्ध करावा अशी विनंती आहे.

वरील संस्था ता. १९-८-३९ रोजीं स्थापन झाल्यावर त्या संस्थेमार्फत श्री साईबाबांचे २१ वे पुण्यतिथीचा पहिला उत्सव ता. २३।१०।३९ रोजीं श्री साईनाथ मंदिर, भिवपुरी रोड, ता. कर्जत; जिल्हा कुलाबा येथें करण्यांत आला. या उत्सवाप्रीत्यर्थ संस्थेमार्फत खालीलप्रमाणें उत्सवाचा कार्यक्रम पार पाडण्यांत आला.:—

१ सकाळीं श्रींचें प्रतिमेवर रुद्राभिषेक, मंगल स्नान, व षोडषोपचारें पुजा, व आरती.

२ दोनप्रहरीं श्रीस महानैवेद्य व प्रसाद भोजन.

३ सायंकाळीं भजन व रात्रौ कीर्तन व आरती होऊन कार्यक्रम पुरा करण्यांत आला.

वरील संस्था आपल्या श्री साईलीला मासिकाची वर्गणीदार होऊं इच्छित आहे. तरी पुढील अंक व्ही. पी. नें संस्थेच्या वरील पत्त्यावर पाठविण्याची कृपा व्हावी. कळावें कृ. लो. हे विनंती.

आपले नम्र साईदास,

वामन आ. गुप्ते (अध्यक्ष)
वासुदेव गो. देशपांडे (संयुक्त चिटणीस)
वसंत सदाशिव सबनीस (कार्यकारी सभासद)

12

# "श्री सद्गुरु साईनाथ सेवा संस्था"

## भिवपुरी रोड; ता. कर्जत, जि. कुलाबा.

वरील संस्थेबद्दल माहिती देतांना ज्या व्यक्तीच्या निधनानंतर ही संस्था अस्तित्वांत आली त्या व्यक्तीबद्दल व त्यांचे व श्री सद्गुरू साईबाबांचे ऋणानुबंधाविषयी थोडीशी माहिती प्रस्तुत प्रसंगीं निवेदन करणें भाग आहे. भिवपुरी, ता. कर्जत येथील रहिवासी कै. केशव रामचंद्र प्रधान हे दौंड, मनमाड भागांत फिरतीवर असतां श्री सद्गुरु साईनाथ महाराज यांची कीर्ति त्यांच्या कानावर आली. व अशा पुण्यशील विभूतीचें दर्शन घडावें म्हणून ते मुद्दाम शिरडी येथें गेले व श्री साईबाबांचे एक परम भक्त बनले. या नंतरच्या कालांत ते शिरडी येथें मधून मधून जाऊन येत असत व एकदां त्यांनीं भिवपुरी येथें येण्याची विनंती केली. श्री साईबाबांना श्री. प्रधान यांच्या आपल्यावरील भक्तीची श्रद्धेची पूर्ण जाणीव होती, पण त्यांना शिरडी सोडून भिवपुरी येथें वास्तव्य करणेचें नव्हतें. तरीपण कै. प्रधानांचे विनंतीचा अव्हेर करणें पसंत नसलेमुळें या पेंचप्रसंगांतून कांहीतरी तोड काढणें त्यांना भागच होते व म्हणूनच श्री साईबाबांनीं आपली एक प्रतिमा कै. प्रधानांच्या हवाली केली व ती भिवपुरी येथें स्थापन करण्यास त्यांना अनुज्ञा केली. श्री. बाबांच्या आज्ञेनुसार इ. स. १९१७ सालीं त्या प्रतिमेची स्थापना प्रधान यांनीं सुमारें दीड हजार रुपये खर्च करून एक लहानसें मंदिर बांधून भिवपुरी येथें केली. व तिची नित्य पूजाअर्चा उत्सव इत्यादि अनुषंगीक गोष्टी ते मोठ्या भक्तीनें करीत असत.

वृध्दापकालामुळें ज्यावेळीं त्यांना उत्सवादि कार्यक्रम पार पाडणें शक्तीच्या बाहेरचे वाटूं लागलें त्यावेळीं त्यांनीं गावांतील मंडळींना हातांशीं धरून "श्री साईनाथ सेवा मंडळ" स्थापन केलें व त्या मंडळाच्या साहाय्यानें ते पुढें उत्सवादी गोष्टी करीत असत.

श्री साईनाथ महाराजांनीं समाधि घेतल्यानंतर त्यांच्या "पुण्यतिथीचा उत्सव ते या मंडळाच्या व इतरांच्या सहाय्यानें करीत असत. पण कालांतरानें आर्थिक परिस्थिती जसजशी तीव्रतेनें जाणवूं लागली त्या वेळेस ह्या मंडळाचे अस्तित्व देखील नष्ट पावले. साधारपणें दोनतीन वर्षें या मंडळानें श्री साईबाबांची

सेवा निरसलपणें व आर्थिक झीज सोसून केली हे त्यांच्या श्री साईबाबा वरील भक्तीचे प्रेमाचें प्रतिदर्शकच होय.

वर उल्लेखिलेल्या **मंडळाच्या विसर्जनानंतर देखील** त्या मंडळांतील दोन तीन सद्गृहस्थांनीं उत्सवादी कार्यक्रम लहानशा प्रमाणांत कां होईना पण कार्यांत खंड पडू नये म्हणून शिकस्तीनें चालू ठेवून ता.१९।८।१९३९ रोजीं **श्री सद्गुरु साईनाथ सेवा संस्था,** " नांवाची नवीन संस्था **स्थापन** केली.

आजच्या " श्री सद्गुरु साईनाथ सेवा संस्थे " च्या आरंभापूर्वीचा इतिहास वर निवेदन केल्याप्रमाणें आहे. नवीन स्थापन झालेल्या संस्थेला कै. प्रधानांनीं आरंभिलेलें कार्य शेवटास नेण्याची पूर्ण उमेद आहे. आज भिवपुरी येथें ज्या मंदिरांत साईनाथ महाराजांच्या प्रतिमा स्थापिल्या आहेत ते मंदिर कै. प्रधानांच्या निधनानंतर व्यवस्थेच्या अभावीं अगदी मोडकळीस आलें आहे. कै. प्रधानांच्या चिरंजीवांना नोकरीनिमित्त भिवपुरी सोडणें भाग पडलें व ते संस्थेंत फक्त कार्यवाहकांत दाखल राहिले आहेत.

भिवपुरी येथील श्री साईबाबा मंदिर चांगल्या स्वरुपांत राहून चिरायु होणें हें सर्वस्वीं बाबांच्या भक्तवृंदाचे निखालस आश्रयावर अवलंबून आहे. तरी त्यांस अशी विनम्र विनंती आहे कीं एकवेळ तरी भिवपुरी येथील या मंदिरास भेट देऊन तेथील एकंदर परिस्थितीचें अगत्यपूर्वक निरीक्षण करावें व त्या मंदिराचें चिरायुत्व राखण्यास शक्यनुसार आपुलकीचे भावानें हातभार लाऊन बाबांचे सेवेचे श्रेय संपादन करावें.

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु ॥

# शिर्डी-वृत्त

## माहे जुलै सन १९३९

### धर्मकृत्यें

श्री. नानासाहेब खारकर ऑ. चिटणीस ( श्रीसाईबाबा संस्थान ) ३७, चरईरोड ठाणे यानीं गोरगरीबास भंडारा भोजन दिलें. ता. १।७।३९

श्री. वसंतराव नारायणराव गोरक्षकर, पाटील बंगला, सांताक्रूझ यांनीं आपले मातुःश्रींचे स्मरणार्थ श्रींचे चरणीपाशीं पांच फकीर, पांच ब्राह्मण, एक सुवासिनी यांना भोजन दिलें. व श्रीस नैवेद्य केला ता. १४।७।३९

### श्री गुरूपौर्णीमा कार्यक्रम.

श्रीच्या रथाची मिरवणूक, ब्राह्मण भोजन. रात्रौ संस्थान गवई यांचें कीर्तन व तसेंच काल्याचें कीर्तन. यंदा श्रीमंत बुटीचे तर्फें त्यांचे कारभारी श्री. जोशी हे हजर होते. त्यांनीं सर्व उत्सवाची व्यवस्था उत्तम ठेवली.

### हवापाणी

उत्तम आहे.

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस.

# माहे ऑगस्ट सन १९३९

## धर्मकृत्यें

श्री. जेठालाल रावळ रंगून श्रीस अभिषेक. श्री. ए. एस पद्मनाभम् डब्ल्यु बी. त्रिचनापल्ली श्रीस अभिषेक. श्री. व्ही. बी. कुपुस्वामी मुदलीयार, अभिषेक–नैवेद्य. श्री. के. एस. कृष्णराव चितळीदुर्ग, अभिषेक. श्री. व्यंकट नारायण अभिषेक. श्री. एम्. ए. वेडल्लमा, अभिषेक. श्री. अंबुल, अभिषेक. श्री. ए. ए. अहिल्लानडम् श्री. मि. पी. सूर्यनारायण बेन्हापुरमगंजम्, अभिषेक. मि. टी. डी. दुराईस्वामी मद्रास, अभिषेक. संपथकुमारम् मद्रास, अभिषेक. श्री. सी. जी. राजा वेलोर, अभिषेक. श्री. सौ. सरस्वती त्रिचनापल्ली, अभिषेक. श्री. के. एस. मनी कोईमतूर, श्रीस अभिषेक.–नैवेद्य–ब्राह्मणसुवासिनी. श्री. गजानन बालकृष्ण मालवणकर, अभिषेक. डॉ. छोटालाल भुलाभाई बडोदा, श्रीस नैवेद्य. श्री. सुंदरराव दि. नवलकर, श्रीस अभिषेक.

## कीर्तनें

अधिक श्रावण वद्य ११ व श्रावण शु. ११ अशीं दोन कीर्तनें सं. गवयांचीं झालीं.

## नवलविशेष

श्री. सी. एन्. कुपुस्वामी अय्यर डि. सेशनजज कॅलीकट यांना श्रींच्या स्नानाचे तीर्थ डबा भरून रे. पार्सलनें पाठविण्यांत आलें.

श्री. जी. व्ही. चेट्टी जाईंट रजिस्ट्रार को. आ. सो. मद्रास शिर्डीस येऊन दोन दिवस राहून श्रीबाबांच्या समाधीचें त्यांनीं दर्शन घेतलें. पूजाअर्चा करून इतर श्रीबाबांचीं सर्व स्थानें पाहून त्यांना फारच आनंद झाला तो त्यांनीं शेरेबुकांत लिहून ठेवला आहे.

श्री. भीमाजी पाटील कोपरगांव यांनीं शिरडी संस्थानास एक मोठा मोर दिला.

## हवापाणी

हिंवताप ( मलेरिया ) सुरू आहे. सूर्य दर्शन क्वचितच होतें.

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस.

# माहे सप्टेंबर सन १९३९

## धर्मकृत्यें

श्री. कु. कमला वाकर, श्रीस अभिषेक. श्री. के. सी. कृष्णराव, श्रीस अभिषेक. श्री. नानासाहेब खारकर ऑ. चिटणीस ठाणें, श्रीस अभिषेक. श्री. आर. नागेश्वरराव बेंगलोर, श्रीस अभिषेक. श्री. मि. टी बालनगी रड्डी अनंतापूर, श्रीस दोन अभिषेक. श्री. मि. सी. चक्रवर्ती अय्यर, श्रीस अभिषेक. श्री. एन. ननजुनीहय्या सेकुर श्रीस अभिषेक. श्री. मथुब्रह्मन ( विश्वनाथन ), श्रीस अभिषेक. श्री. श्रीरंग अम्मल मद्रास, श्रीस अभिषेक. श्री. एम्. माली रड्डी- श्रीस अभिषेक. श्री. मि. नरसिंहचार्ल्, श्रीस अभिषेक. श्री. के. नटेश अय्यर टेंपाकुला, श्रीस अभिषेक. श्री. रावसाहेब एस. सुब्बिय्याचेट्टी नेलोर यांनीं श्रीस लघुरुद्राभिषेक केला. श्री. वि. अ. वैद्य अंधेरी श्रीस अभिषेक. श्री. सुंदरराव दि. नवलकर मुंबई श्रीस अभिषेक.—ब्राह्मण सुवासिनी, भोजन. नैवेद्य.

श्री. संजीवाप्पा अँड सन्स अडोनी यांनीं ता. २०।९।३९ व ता. २१।९।३९ असें दोन दिवस श्रीची खालीलप्रमाणें सेवा केली. श्रीस दोन अभिषेक पंचामृत स्नान, दुधाचें स्नान, श्रीचे समाधीस घातलें. तुपाचे दोन नंदादीप ( एक द्वारकामाईत व श्रीस- माधी मंदिरांत ) असे लावले. श्रीचे धुनीत ११ शेर तूप अर्पण केलें. श्रीमंदिर, चावडी द्वारकामाई, या तीन्ही ठिकाणी मिळून ६०।७० नारळ फोडले, व मुलांना खाऊ म्हणून चार शेर काजू वाटले. शेरदोनशेर कापूर लावला. श्रीचे गुरुरायाचें समाधीपाशीं तुपाचा नंदादीप लावला, शेरभर धूप जाळला. व पाच नारळ व खडीसाखर वाटली. दोन दिवस श्रीस महानैवेद्य केला. गांवांतील सर्व ब्राह्मण मंडळीस व श्रीसंस्थानच्या नोकर व सेवेकरी मंडळीस पक्वान्नाचें भोजन मिळून सुमारे २०० मंडळीना भोजन दिलें. ता. २२।९।३९ रोजीं पुन्हा कर्पूर आरती श्रीचे द्वारकामाईत पुन्हा ५।५ नारळ फोडून सदरची मंडळी आपले गांवीं गेलीं.

श्री. सुंदरराव दि. नवलकर १४३ साईभुवन, प्रिन्सेस स्ट्रीट मुंबई नं. २ यांनीं श्रावण मासानिमित्त श्रीस दर गुरुवार, शुक्रवार, शनिवार, सोमवार, मंगळवार. असे अभिषेक केले. व शेवटीं श्रीस नैवेद्य ब्राम्हण—सुवासिनी भोजन. असें धर्मकृत्य केलें. तसेंच ता. २५-९-३९ रोजीं श्रीस अभिषेक व दूधपुरीचा महा नैवेद्य पांच ब्राम्हण एक सुवासिनी असें सहा पात्रास दुधपाक पुरीचें भोजन दिलें.

## गणेश उत्सव

चालूसाली शिर्डी येथील सर्व मास्तर मंडळींनी मिळून शाळेतील मुलांकडून ी साईबाळमेळा साजरा केला. गणेश चतुर्थी पासून दहा दिवस व्याख्यान. वादे, भजन, गायन, नाट्यप्रयोग असे अनेक कार्यक्रम करून गांवांतील लोकांना व ाळेंतील मुलांना शिर्डी ही संतभूमी आहे, याचें महत्व पटवून दिलें, श्रीमंगलमूर्तीची रवणूक काढून सर्वत्र मंडळींना खोबरें, खडीसाखर, डाळ वाटून गणपती विसर्जन केलें.

ता. २८।९।३९ रोजीं गुरुवारची चावडी झाले नंतर संस्थान गवई बुवा यांचें ीमंदिरांत दोन तास कीर्तन झालें, त्यानंतर अवघ्या मंडळीस मसाल्याचें दूध, चिवडा ी. भाऊसाहेब धुमाळ यांनीं वाटला. श्री. ए. आर. मुल्की कलकत्ता यांनीं वडिलांचे ाद्ध तिथीचे दिवशीं २ फकिरांना भोजन दिलें.

श्री गोकुळाष्टमी उत्सवानिमित्त दोन कीर्तनें झालीं. व एक श्री. अहिल्यादेवी होळकर ांचे पुण्यतिथी निमित्त कीर्तन झालें श्रावणवद्य ११ निमित्त व भाद्रपद शु. ४ गणेशचतुर्थी नेमित्त व भाद्रपद शु. ११ निमित्त व श्रीमंत रा. ब. भाऊसाहेब धुमाळ यांचे आज्ञेवरून ्क अशीं आणखी जास्त चार कीर्तनें झालीं.

श्री. गोकुळाष्टमी उत्सव चांगला झाला. त्याचा सर्व कार्यक्रम स्वतंत्र उत्सवाचे महवाल्यांत आलेला आहे त्यामुळें पुन्हा उल्लेख केलेला नाहीं.

## नवलविशेष

( १ ) श्री. एम्. एम्. रंगप्पा ( संजीवाप्पा अँड सन्स ) कॉटन एक्सपोर्टर्स मु. अडोनी जि. बळ्ळारी. हे गृहस्थ नुकतेच श्रीसाईबाबांचें दर्शनाकरितां ता. १९।९।३९ मंगळवार रोजीं मुलाबाळांसह शिर्डीस आले होते.

मंगळवार, बुधवार, दोन दिवस शिर्डीस राहून गुरुवारीं परत जेवण करून ोलापूरकडून दुपारच्या गाडीनें दौंडला जावें व मद्रास एक्सप्रेसनें अडोनीस यावें असा नेश्चय करून व त्याप्रमाणें गुरुवार ता. २१-९-३९ रोजी मद्रास एक्सप्रेस ( डाउन ) ा दौंडला सेकंडक्लास रिझर्व ठेवण्याबद्दल मुंबईस तार दिलेली होती, पण शिर्डीस आल्यानंतर दुपारची आरती भोजन झालें नंतर श्री द्वारकामाई, चावडी, वाचनालय लेंडीबाग वगैरे बाबांची स्थानें पाहून परत श्रीसमाधी मंदिरांत आले. थोडी विश्रांति घेऊन पुन्हा श्री द्वारकामाईंत गेले, व तेथें असलेल्या श्रींच्या छबीकडे एकसारखे न्याहाळून ाहत एक घंटाभर तेथें बसले व नंतर मंदिरांत परत आले. दुसरे दिवशीं सकाळीं